

# माझं निर्माण : एक अखंड प्रवास

- डॉ. पवन पाटील

मी मूळचा धुळ्याचा, आई वडील प्राथमिक शिक्षक. मला लहानपणापासूनच चित्रं, माती-लाकडाच्या वस्तू, अभिनय या गोष्टींची आवड. तासन तास मी चित्रच काढत बसे किंवा मग कुठल्यातरी वस्तूचं निरीक्षण. माझे पालक मला यासाठी प्रोत्साहन द्यायचे. त्यानंतर मात्र बारावीच्या वेगवान भोवऱ्यात जो अडकलो तो पुण्याला आयुर्वेदाच्या महाविद्यालयातच येऊन पोहोचलो. या बारावीच्या वर्षभरातली एकही जपून ठेवावी अशी आठवण माझ्याजवळ नाही.

पुण्याला आल्यानंतरची सुरुवातीची तीन वर्षे मी 'गर्भश्रीमंतीत'(!) जगलो. इ-स्क्वेर, मॅक-डोनल्ड, प्लॅनेट-एम, नाटकं, बालगंधर्व, संदीप खरे, प्रदर्शनं, बाईक्स व खूप मित्र मैत्रिणी. आपला आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारला आहे असं मला पक्कंच वाटायला लागलं. एखाद्या चकचकित "ब्रॅंन्डेड" दुकानात जायला माझ्या मोठ्या भावाला मोठ्या पगाराची नोकरी असूनही संकोच व्हायचा, अशा मोठमोठ्या दुकानांमधे मी सहजतेने वावरायचो!



याचकाळात अधिकांश आयुर्वेद शिकणाऱ्या मुलांप्रमाणे माझ्याही मनात आयुर्वेदाविषयी खूप प्रेम व अस्मिता जागृत झाली आणि अलोपॅथीविषयी घृणा.

माझं स्वत:चं एक मोठ्ठं आयुर्वेदिक चिकित्सा केन्द्र असेल, त्यासोबतच हेल्थ-स्पा असेल. खूप रुग्णांना अनेक सुविधा देता येतील आणि त्यासाठी खूप पैसेही घेता येतील....अशी स्वप्नं मी पहायचो.

मध्यंतरी मी माझ्या काही मित्रांसोबत अंध मुलांना, काही विषय शिकवायला, “निवांत अंध मुक्तविद्यालयात” गेलो होतो. तेव्हा पहिल्यांदाच मला ‘मी’ सोडून दुसरं विश्व दिसलं. त्या सर्व मुलांसाठी राबणाऱ्या मीरा बडवे मॅडम यांनी मला एका मोठ्या आणि खोट्या स्वप्नांतून जागं केलं. माझ्या काही जवळच्या मित्रांशी या विषयी चर्चा झाली. आपल्या आजूबाजूला लोकांचे अनेक प्रश्न आहेत. व आपण ते सोडवण्यासाठी काहीतरी केले पाहिजे; असं आम्हाला वाटायला लागलं. ज्या बदलाविषयी आपण बोलतोय त्या बदलाची सुरुवात स्वत:पासून करायची, स्वत:च्या वाईट आणि चंगळवादी सवयी बदलायच्या, आपण सध्या ज्या प्रकारे पेट्रोल व पैसा उडवतोय ते कमी करायचं,... अशा विचारप्रक्रियेतून जात असतांना मी “निर्माण” मधे आलो..






आपल्या जगण्याला खरा अर्थ त्या जगण्याचे प्रयोजन शोधून, त्या प्रयोजनपूर्तीमधेच मिळतो. लोकांना, समाजला कशाची गरज आहे? समाजाची गरज, अडचणी, प्रश्न म्हणजे माझा “स्वधर्म”; याची जाणीव मला निर्माणमधे झाली.हा स्वधर्म मी कसा शोधू? मी आयुष्यात कुठल्या मार्गाची निवड करू, असा प्रश्न पडल्यावर “आयुष्यात पाहिलेल्या सर्वात दु:खी माणसाचा चेहरा आठवा आणि मी निवडलेल्या मार्ग़ाने त्या माणसाचं दु:ख दूर करण्यात मदत होत असेल तर तोच तुमच्या आयुष्याचा मार्ग होय.” असं गांधीजी म्हणत. एका बाजूला निर्माणमधून मिळालेली ही तेजस्वी शिकवण व दुसऱ्या बाजूला ‘’शिक्षण संपल्यानंतर आता पुढे काय?’’; हा मला पडलेला व्यावहारिक प्रश्न. सायकियाट्री, इमर्जंसी मॅनेजमेंट, स्वत:चा दवाखाना असे माझ्यासमोर काही वजनदार पण सरळ सोपे पर्याय होते. आत्तापर्यंतचे माझे शिक्षण हे सातवी नंतर आठवी नंतर नववी... असे सलग, विनाथांबा घडत आले होते. त्याच्यावर फार विचार करण्याची संधी मला मिळाली नव्हती. आता पुन्हा मला त्याच चक्रात अडकायचे नव्हते. निर्णय

घेण्यासाठी मी स्वत:ला प्रचंड स्पर्धेच्या या वेगवान, न थांबणाऱ्या पाईपलाईनमधून बाहेर काढावे, असे मला वाटत होते. “निर्माण फेलोशिप” ही मला यासाठी योग्य अशी संधी वाटली, ज्यात मला प्रत्यक्ष समाजात राहून त्याच्या प्रश्नांना जवळून समजून घेता येणार होतं, तो प्रश्न व त्यामार्फत स्वधर्माचा शोध हे कोडं सोडवण्यासाठी मी गडचिरोली ह्या मागासलेल्या व दुर्गम भागात येऊन एक वर्ष काम करायचं ठरवलं.

डॉ. अभय व राणी बंग (नायना व अम्मा) याच्या ‘सर्च’ या संस्थेत माझा प्रवास सुरू झाला. सर्चच्या दवाखान्यात काम करत असतांना मला बसल्या बसल्याच समाज दर्शन होत होतं. रुग्णाची कमकुवत आर्थिक परिस्थिती, अंधश्रध्दा, मलेरिया, सर्पदंश , डायरिया, लैंगिक आजार, अशा अनेक आजारांचे मोठे प्रमाण मी येथे पाहिले, ज्यांचे संदर्भ हे मी शहरात शिकलेल्या आजारांपेक्षा खूप वेगळे होते. अशा परिस्थितीतही आरोग्यसेवा ही गावातल्या प्रत्येकापर्यंत पोहचावी म्हणून झटणाऱ्या नायना- अम्मांकडून आपला रुग्णाकडे व त्याच्या आजारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा असावा, हे मी शिकत गेलो. आदिवासींशी बोलता यावे, त्यांची दुखणी समजून घ्यावीत म्हणून मी आवश्यक तेवढी ग़ोंडी भाषा शिकलो. 40 ते 50 रुपयांमधे महिनाभराची औषधे येतील अशी उपयुक्त व प्रत्येक रूग्णाला परवडणारी, मोठ्या कंपन्यांच्या प्रलोभनांना बळी न पडलेली चिकित्सा पदधती मी या दोन उच्चशिक्षीत तज्ञांकडून शिकत होतो. माझी प्रत्येक कृती ही रुग्णाच्या दु:खाचे शमन करणारी हवी, त्यात माझा पॅथीविषयीचा स्वाभिमान व दुराग्रह याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे गरज पडल्यास रुग्णाचे पाय दाबून जर त्याला बरं वाटत असेल, तर तेही मी करेन, हा दृष्टीकोन माझ्यात आला. शस्त्रक्रियेनंतर बराचकाळ एडमिट राहणाऱ्या रूग्णांना मनोरंजन व शिक्षण म्हणून चित्रकला, हस्तकला, त्यांच्या व्यायामासाठी भजनफेऱ्या, असे प्रयोग मी करून बघत होतो. आयुष्यभरात कधी हातात पेन्सिलही न धरलेल्या हरी नेवारे किंवा रैनू नैताम या सत्तरी ओलांडलेल्या आजोबांना चित्रकलेच्या 3-3 वह्या भरून चित्र काढतांना बघायला खूप छान वाटायचं. मी निवडलेली दिशा योग्यच आहे, याचे पुरावे होते ते.

केंद्र सरकारच्या ज़ननी सुरक्षा योजना या योजनेची गावपातळीवरील अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी मी काही दिवस एका खेडेगावात जाऊन राहिलो. तो अभ्यास करतांना गावातील लोकं, राजकारण, मृत्यू, व्यसन, आरोग्य व्यवस्था, शेती, उत्सव हे मला जवळून समजून घेता आलं. खरंतर मीही मूळचा खेड्यातला, पूर्वी अनेकदा माझ्या त्या गावाला जायचो पण कधीही तिथे रमलो नाही. कारण त्या खेड्यातून शहराकडे व शहरातून अजून मोठ्या शहराकडे जाणे म्हणजेच आपला विकास, असे काहिसे

मला वाटत होते. गडचिरोली जिल्ह्यातील या गावातील माझ्या वास्तव्यामुळे मी परत माझ्या मूळ गावाशी जोडला गेलो. जननी सुरक्षा योजनेचं त्या गावातलं चित्र हे शासकीय माहितीपेक्षा खूप वेगळं होतं. सरकारी रजिस्टरनुसार जरी 18 पैकी 15 मातांना योजनेचा पूर्ण लाभ मिळाला असला तरी प्रत्यक्षात मात्र केवळ 7 मातांना या योजनेचा पूर्ण लाभ मिळाला होता. याचाच अधिक व्यापक अभ्यास करण्यासाठी मी आता 400 मातांचा अभ्यास करत आहे.

एखाद्या क्षेत्रात घडणारे मृत्यू कुठल्या प्रमुख कारणांनी घडतात हे जाणून घेणे हे पब्लिक हेल्थ व हेल्थ पॉलिसी ठरवतांना फार महत्वाचे असते. सर्चच्या कार्यक्षेत्रातील गावात घडणाऱ्या प्रत्येक मृत्यूची नोंद ही सर्चच्या कार्यकर्त्यांकडून पूर्वीपासून केली जाते. अशा प्रत्येक मृत्यूच्या वेळची माहिती जवळच्या नातेवाईकांना विचारून त्या मृत्यूंच्या कारनाचा शोधही लावण्याचा प्रयत्न केला जातो. या पूर्ण प्रक्रियेत काही त्रूटी होत्या. त्या त्रूटी दूर करण्यासाठी, नवीन, अत्यंत शास्त्रीय पध्दतीने या मृत्यूंच्या कारणाचा शोध लावण्यासठी million death study या भारतातील सर्वात मोठ्या अभ्यासाच्या तज्ञांकडून सर्चच्या फिल्ड सुपरवायझरांचे, संशोधन विभागातील प्रमुख व मी यांचे ट्रेनिंग डिसेंबर 2008 मध्ये सर्च येथे झाले. फिल्ड सुपरवायझर्सनी आणलेली ही माहितीतीचे विष्लेशन करून घडलेल्या मृत्यूच्या कारणाचा शोध लावण्याचे काम माझ्याकडे होते. या नविन पद्धतीनूसार मृत्यूच्या वेळची परिस्थीती, मृतकाचे आजार याविषयीची माहिती जमवतांना, ती मांडतांना सुरुवातीला आमच्या कार्यकर्त्यांना सुरुवातीला बऱ्याच अडचणी येत होत्या, चुका होत होत्या. मलाही माझं काम करायला बराच वेळ लागत होता. नवी पध्दत असल्यामुळे हे घडणारच होतं. फिल्ड सुपरवायझर्सनी आणलेल्या महितीतील चुका शोधून त्या दूरूस्त करण्यासाठी ट्रेनिंग देवून हा प्रश्न सोडवला व माझा वेग वाढवण्यासाठी मी घडलेल्या 50 मृत्यूंच्या कारणाचे निदान करून सराव केला. कुठल्याही मोठ्या कामाची पूर्ती ही त्यातील अनेक लहान लहान पायऱ्यांच्या अचूकतेतूनच होत असतेहे माझ्या लक्षात आलं. एका मृत्यूच्या कारणाचे निदान अचूक येण्यासाठी मृतकाच्या नातेवाईकांकडून अधिकाधिक अचूक माहिती मिळवणे, ती योग्य पध्दतीने नोंदवणे, त्या माहितीवरून मृत्यूचे संभाव्य कारण शोधणे, त्याची अचूकता तज्ञांकडून तपासून घेणे या प्रत्येक पायरीसाठी संशोधनाची स्वत:ची एक शिस्त लागते. त्याशिवाय आपल्याला अपेक्षित कार्य अपेक्षित अचूकतेने पूर्ण होत नाही. हे माझं शिक्षण झालं.

**<u>निर्मल:-</u>** पाच वर्षांखालील मुलांच्या मृत्यूंची सर्वात महत्वाची कारणे ही न्यूमोनिया व डायरिया हे आजार आहेत. जगात दरवर्षी 20 लाख व भारतात रोज 1000 मुले

डायरियाने मरतात. केवळ पाणी व साबणाने स्वच्छ हात धुतल्यावर डायरिया होणाऱ्या 47% मुलांना व न्यूमोनिया होणाऱ्या 16% मुलांना आपण मरण्यापासून वाचवू शकतो. ज्या गावात मी काही दिवस ज.सु.यो. चा अभ्यास केला त्या गावातील 64 घरांपैकी केवळ 6 घरांमधे हात साबणाने धुतले जात होते. आजारांपासून स्वत:ला वाचवण्यासाठी इतका सोपा उपाय असूनही मुलं, लोक का हात धूत नाहीत- हे मला शोधायचे होते. न्यूझीलंडमधील एका साध्या उपकरणावरून प्रेरणा घेऊन मी "निर्मल" हे हात धुण्यासाठीचे उपकरण तयार केले. पाण्याची कमतरता, साबण असूनही त्याचा हात धुण्यासाठी उपयोग नाही, मुळात हात धुणे का गरजेचे याची माहितीच नसणे अशा अडचणी सोडवण्यासाठी निर्मल हे सर्वसमावेशक उत्तर होते. सुरूवातीला शोधग्राममधील व त्यानंतर कुडकवाही, सावरगाव, चातगाव, उशीरपार येथील मुलांना निर्मल बनवायला व त्याचा वापर करायला शिकविले.. केवळ हात धुणे पुरेसे नव्हते तर हात स्वच्छ धुणे गरजेचे होते. म्हणून मग शस्त्रक्रियेपूर्वी सर्जनने कशा पद्धतीने हात धुवावेत याच्या जागतिक आरोग्य संघटनेने( WHO ) काही पायऱ्या सुचवलेल्या सर्व पायऱ्यांना "मछली", "चून्नूमुन्नू" अशा मनोरंजक स्वरूपात बदलून मुलांना शिकवायला सुरूवात केली. या पद्धतीने हात धुणे मुलांना जमते व मनोरंजक वाटू शकते, हे या गावातील मुलांच्या केलेल्या सर्व्हेतून आढळलं. मुलांच्या गरजेनुसार निर्मलमधे आवश्यक ते बदल करून निर्मल शाळेत लावलं जावू लागलं. घरीही मुलांनी शाळेप्रमाणेच स्वच्छ हात धुवावेत म्हणून "घरोघरी निर्मल" ही पुढची पायरी होती. दिवसाला किमान चार रुपयांचा खर्रा( तंबाकू+सुपारी) खाणाऱ्या मुलांना 25 रुपयांची बचत करायला लावून त्या पैशातून आम्ही हे निर्मल काही घरांमधे बसविले. स्वच्छ हात धुण्याच्या 20 पायऱ्या त्याच क्रमाने या मुलांना करतांना पाहून माझा उत्साह वाढत होता.









**कुडकवाही गावच्या छोट्या शैलेशने स्वत:च्या घरी बसवलेले निर्मल!**

आजूबाजूच्या गावांमधेही आता अनेक मुलांच्या मोबाईल मधे ब्लू-फिल्म्स असतात, येथील मुलेमुलीही आता तासनतास टीव्हीला चिकटून बसलेली असतात. खर्रा तंबाखुच्या ठेल्यावर सतत आढळणारी लहान मुले व तरूण, हे चित्र रोजचच झालंय. या सर्वांसाठी काही पर्याय आहेत का हे मला शोधून काढायचे होते. म्हणून एका गावाच्या लहान मुलांसाठी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये गावाबाहेरच्या आंब्याच्या झाडाखाली मी व माझी सहकारी चेतना आम्ही खेळ घेण्याचे ठरवले.. यासाठी मी वाचलेली सर्व पुस्तके, त्यातले खेळ, कलाप्रकार व केलेले नियोजन मुलांनी उधळून लावले. मग मी त्यांच्या कलाकलाने पुढे जात राहिलो. माझ्या आतील सर्जनशीलतेचा मला यातून प्रत्यय येत होता. हळूहळू गावातील तरुणही याउपक्रमात सहभागी झाले. ते जेव्हा तासनतास चित्र रंगवण्यात मग्न झालेले दिसायचे तेव्हा वाटायचं की दिवसभरातून किमान 8 रुपयांचा खर्रा खाणाऱ्या या तरुणांना 9 रुपयांची रंगाची पेटी का खरेदी करता आली नाही? हातात पैसे असूनही त्यांचा वापर कधीही कला, छंद जोपासण्यासाठी झालाच नाही. मला नेमकं काय आवडतं? हे समजण्यासाठी मुलांजवळ इतर पर्याय उपलब्धच नाहीत. मनोरंजन व आनंदप्राप्तीसाठी

सर्जनात्मक पर्याय उपलब्ध असणं हे केवढं मोठं privilege आम्हाला असतं. जे या गावातील या मुलांना उपलब्धच नव्हतं. असे सर्जनशील पर्याय उपलब्ध नसतील, करायला काही काम नसेल व पूर्ण करायला काही ध्येय नसेल तर ही पूर्ण पिढीच व्यसन, ब्लू फिल्म्स व बेरोजगारीच्या भोवऱ्यात अडकण्यापासून कशी बचावेल? म्हणून यापुढचं काम मी मुलांसोबत त्यांच्यातलीच ही सर्जनशीलता सोबतीला घेवून प्रतिबंधात्मक आरोग्य व व्यसनं या विषयात करायचं ठरवलं आहे.



**पहिल्या निर्माण अंकाचे प्रकाशन! ह्या अंकाचे मुखपृष्ठ तयार करतांना माझ्यातला चित्रकार जागा झाला. आणि मला जाणवला... एका कलावंताची निर्मिती आणि निर्माणीमधली कला ह्यातला अभेद!**

एक वर्ष संपले आहे. या एका वर्षाकडे वळून बघतांना, मी हे नसतं केलं, तर काय केलं असतं? असा विचार मनात येतो. त्यावेळी मला माझे इतर मित्र दिसतात, ज्यांच्या आयुष्यात या एका वर्षात विशेष असं काही क्वचितच घडलं. नविन सिनेमा, मिळालेला जॉब किंवा वेगवेगळ्या प्रवेश परिक्षांची तयारी हेच विषय. त्यांच्याशी बोलायला माझ्याजवळ मात्र दररोज नवनवीन विषयांची मालिका. या एका वर्षात अनेक गोष्टींत अनिश्चितता आणि म्हणूनच उत्सुकताही प्रचंड होती. या काळात जशा मी खूप चुका केल्यात, अडखडलो, प्रश्न सुटतच नाहीत व प्रयत्नही कमी पडत आहेत, म्हणून उदास

झालो, तशीच जगण्यातली खरी श्रीमंती व जिवंतपणा आणि समाधानही भरभरून उपभोगलं. हा आवेग आणि अनिश्चितता पुन्हा पुन्हा अनुभवण्यासाठी आणि सुरू केलेल्या कामांच्या पूर्ततेसाठी, नवीन प्रश्नांच्या शोधात मी आणखी काही काळ येथे राहण्याचे ठरविले आहे. मित्रांची सोबत व नायना- अम्मांचं प्रेमळ मार्गदर्शन सतत या प्रवासात आहेच माझ्या सोबतीला. माझं "जीवितकार्य" म्हणजे कुठलं ठिकाण नसून ही या वेगळ्या प्रवासाची दिशा आहे, हे ही मला समजलं आहे.




**डॉ. पवन पाटील**

**निर्माण फेलो, सर्च**

**pawangpatil@gmail.com**